# डोंबिवली वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

महाराष्ट्र पोलीस

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.deptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वाशे/अधिसूचना/१०४/२०२५ दि. २३/०५/२०२५

## –: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

ज्याअर्थी, डोंबिवली वाहतूक उपविभागाचे हद्दीत दि. २३/०५/२०२५ व दि.२४/०५/२०२५ रोजी सकाळी ०६:०० ते संध्याकाळी १८:०० वाजे दरम्यान मोठागाव–मानकोली ब्रिज येथे एस आर ब्रदर्स लोकशन यांचे वतीने ' धुरंदर ' या हिंदी सिनेमाचे शुटींग मोठागाव–मानकोली ब्रिजवरील स्वामी नारायण सिटी चौक ते सुरई गाव चौक पर्यंत डोंबिवली कडुन मानकोली भिंवडी कडे जाणारी नवीन ब्रिजवरील वाहिणी याठिकाणी रोडवर करण्यात येणार आहे. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी शरद ओहोळ, सहायक पोलीस आयुक्त, भिंवडी वाहतूक विभाग, अतिरीक्त कार्यभार पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकांराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

प्रवेश बंद– रेतीबंदर रोड मोठागाव रेल्वे फाटककडुन मोठागाव–मानकोली ब्रिज कडे येणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना स्वामीनारायण सिटी चौक येथे 'प्रवेश बंद' करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग– सदरची सर्व वाहने मोठागाव–मानकोली ब्रिजवरील स्वामीनारायण सिटी चौक ते सुरई गाव चौक पर्यंत सुरई गाव चौक ते स्वामीनारायण सिटी चौक या मार्गिकेवरून इच्छित स्थळी जातील.

सदर अधिसूचना दि. २३/०५/२०२५ रोजी व दि. २४/०२/२०२५ रोजी सकाळी ०६:०० वा. ते सायंकाळी १८:०० वा. पावेतो अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सिजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

(शरद ओहोळ)
सहायक पोलीस आयुक्त,
भिंवडी वाहतुक विभाग, ठाणे शहर
अतिरीक्त कार्यभार
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सविनय सादर
मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे
मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–३, कल्याण, विशेष शाखा, ठाणे
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे, कल्याण

Scanned with OKEN Scanner
Scanned with OKEN Scanner

परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, कल्याण
विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे/कल्याण
नियंत्रण कक्ष, ठाणे/कल्याण शहर

<u>प्रत</u> :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर
२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.

<u>प्रत</u> :– समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष, ठाणे
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी

<u>प्रत</u> :– स.पो.आ. कल्याण वाहतूक विभाग, पोनि डोंबिवली, वाहतूक उपविभाग, ठाणे शहर

Scanned with OKEN Scanner